तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk2a@dte.org.in Internet :http/www.dtemaharashtra.gov.in

क्रमाक:२अ/एडीएम/प्रवेश/२०१६/ ९४५४
दिनांक : 27 OCT 2016

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती

विषय:- शैक्षणिक वर्ष २०१७ - १८ मधील एमबीए/एमएमएस आणि एम.फार्मसी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षेबाबत....

संदर्भ :-१) क्र.टिईएम- २०१५/सीआर५३६/टिई- ४, दि. ११ मार्च २०१६
२) क्र. टिईएम२०१५/१२१०/प्र.क्र.४३९/तांशि- ४, दि. २८ सप्टेंबर २०१५

उपरोक्त संदर्भाकिंत शासन निर्णय व अधिसूचनेनुसार राज्यातील एमबीए/एमएमएस या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी राज्याच्या सामायिक प्रवेश परीक्षा आणि अखिल भारतीय कोटयातील प्रवेशासाठी एआयसीटीई द्वारे घेण्यात येणारी CMAT ही एक प्रवेश परीक्षा निर्धारीत करण्यात आलेली आहे. त्यामुळे अखिल भारतीय कोटयात प्रवेशोच्छुक उमेदवारानी सदर परिक्षेला बसणे ईष्ट राहील.

तसेच एम फार्मसी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी एआयसीटीई द्वारे घेण्यात येणारी राष्ट्रीय पातळीवरील GPAT परीक्षा निर्धारीत करण्यात आलेली आहे.त्यानुसार राज्यातील प्रथम वर्ष एम.फार्मसी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०१७ - १८ मध्ये प्रवेश घेऊ इच्छिणा-या सर्व उमेदवारांना राष्ट्रीय स्तरावरील GPAT परीक्षा देणे अनिवार्य आहे.

वरीलपैकी एमबीए/एमएमएस पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अखिल भारतीय स्तरावरील CMAT परीक्षेसाठीची Registration प्रकिया दिनांक १०.१०.२०१६ पासून सुरू झालेली असून रजिस्ट्रेशनसाठी अंतिम दिनांक १०.१२.२०१६ आहे. याबाबतची अधिक माहिती http://www.aicte-cmat.in/candidate/login.aspx# या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

एम.फार्मसी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अनिवार्य केलेल्या एआयसीटीई द्वारे घेण्यात येणारी अखिल भारतीय स्तरावरील GPAT परीक्षेसाठीची Registration प्रकिया दिनांक १०.१०.२०१६ पासून सुरू झालेली असून रजिस्ट्रेशनसाठी अंतिम दिनांक १०.१२.२०१६ आहे. याबाबतची अधिक माहिती http://aicte-gpat.in/College/index_New.aspx या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

तरी आपल्या विभागातील सर्व एमबीए/एमएमएस तसेच औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाना याबाबतच्या सूचना देण्यात याव्यात. तसेच सोबतची सूचना त्यांच्या महाविद्यालयातून सूचना फलकावर प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी दर्शविण्याबाबत कळविण्यात यावे.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई

प्रत: प्राचार्य/संचालक, सर्व व्यवस्थापनशास्त्र आणि औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये त्यांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास वरील बाब आणावी.

D:\OLD PC DATA\Admission २०१७- १८\GPAT compulsory notification.docx

पृष्ठांकन क्र.विकाऔ/शिक्षण/२०१६/ ६६८८
दिनांक :- 28 OCT 2016

प्रति, प्राचार्य,
एमबीए/एमएमएस व एम.फार्मसी पदव्युत्तर पदवी संस्था
औरंगाबाद विभाग

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील एमबीए/एमएमएस आणि एम.फार्म.सी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षेबाबत उपरोक्त मा.संचालनालयाच्या पत्रात नमुद केलेल्या नुसार कार्यवाही करण्यात यावी.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना प्रत देण्यात येवून सुचित करण्यात येते की, सदरील पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.